॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.६ (प्रतिनिधी): कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक म्हणून प्रा.योगेश पाटील यांनी गुरूवार दि. ६ जुलै रोजी प्रभारी संचालक प्रा. दीपक दलाल यांच्याकडून पदभार स्वीकारला.

विद्यापीठाने मे महिन्यात परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या संचालकपदासाठी मुलाखती घेतल्या होत्या. त्यामधून प्रा. योगेश पाटील यांची संचालकपदी निवड करण्यात आली. प्रा. पाटील हे लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठातंर्गत इंस्टिट्युट ऑफ पेट्रोकेमिकल्स इंजिनिअरींग येथे अधिव्याख्याता पदावर कार्यरत होते. त्यांनी एम.टेक.(संगणकशास्त्र) ही पदवी सुवर्ण पदकासह प्राप्त केली आहे. अध्यापनाचा त्यांना २८ वर्षेपेक्षा अधिक अनुभव आहे. तसेच लोणेरे येथील विद्यापीठात सहयोगी परीक्षा नियंत्रक म्हणून ६ वर्षे तसेच औरंगाबाद येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात एक वर्ष परीक्षा नियंत्रक म्हणून त्यांनी काम केले आहे.

सहा जुलै रोजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक प्रा.दीपक दलाल यांच्याकडून प्रा. पाटील यांनी पदभार स्वीकारला. प्रा. दलाल हे डिसेंबर, २०२१ पासून प्रभारी संचालक म्हणून काम पाहत होते. पदभार स्वीकारतांना कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे, अधिष्ठाता प्रा. अनिल डोंगरे, वित्त व लेखाधिकारी सीए रवींद्र पाटील, संचालक डॉ. राजेश जवळेकर यांच्यासह विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी उपकुलसचिव के.सी. पाटील व डॉ. मुनाफ शेख यांनी मनोगत व्यक्त केले.

### बातमी नं. २

जळगाव दि.६ (प्रतिनिधी): कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथील भौतिकशास्त्र प्रशाळेमधील इलेक्ट्रॉनिक्स विभागात दि. ३०जून, २०२३ पासून एम.एस्सी. (इलेक्ट्रॉनिक्स) अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. सदर अभ्यासक्रमासाठी बी.एस्सी. (इलेक्ट्रॉनिक्स / फिजीक्स/ कॉम्प्युटर सायन्स/ इलेक्ट्रॉनिक्स सायन्स) किंवा बी.व्होक. इन इन्डस्ट्रीयल ॲटोमेशन किंवा बीई / बी.टेक. वुईथ इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन / इलेक्ट्रॉनिक्स /इन्स्ट्रीम्युटेशन असलेले विद्यार्थी प्रवेशास पात्र राहतील. अधिक माहिती www.nmu.ac.in या वेब साईट वर युजी/पीजी ॲडमिशन २०२३-२४ मध्ये मिळेल. तेव्हा पात्र असलेल्या विद्यार्थ्यांनी त्वरीत नोंदणी करून आपला प्रवेश निश्चित करावा असे आवाहन भौतिकशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा. ए.एम. महाजन यांनी केले आहे.

---

जा.क्र.: कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ दिनांक: ५ जुलै, २०२३

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी